26

# महात्मा फुले यांचा जाती अंताचा कार्यक्रम

प्रा. सुरवसे जी. एच.
इंग्रजी विभाग,
शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम

समाजिक परिवर्तनाच्या प्रश्नांकडे महात्मा फुले यांनी शोषित पिडीत जाती समुहांच्या दृष्टीकोनातुन पाहिले. हिंदु समाज व्यवस्थेच्या आकृतीबंधास हात न लावता केल्या जाणाऱ्या सामाजिक सुधारणांच्या प्रयत्नासंदर्भात उच्च वर्ण जाती सुधारकांवर महात्मा फुलेनी मर्मभेदी टीका केली. प्रस्थापित समाजव्यवस्थेवर स्वत:चे प्रभुत्व टिकविण्यासाठी केले जाणारे प्रयत्न ब्राम्हणी डाव पेचाचा एक भाग वाटतो. संपूर्ण मानव जातीसाठी धर्म, वंश, जात, भाषा, वर्ण या आधारावर कुठलही भेदभाव न करता समता प्रस्थापित होणे आवश्यक होते. संपूर्ण मानव जातीसाठी समतेच्या तत्वाचा पुरस्कार करतात त्यांच्या मते ब्राम्हणी धर्माने निर्माण केलेले मानसिक आणि सामाजिक पर्यावरण अशा प्रकारच्या कोणत्याही समतेच्या कल्पनेस विरोध करते. हिंदु धर्मातील संकल्पना आत्मा, पुर्नजन्म, अवतार, कर्मसिध्दांत, स्वर्ग नरक यासारख्या हिंदु धर्मातील संकल्पना समाज व्यवस्थेच्या स्तरीकरणात अधिकारांची उतरंड जाणीवपूर्वक निर्माण केली गेली आहे असे महात्मा ज्योतीराव फुल्यांना वाटते. हिंदुधर्मग्रंथच समाजव्यवस्थेवर आधारले असल्याने तिचे उच्चाटन करणे संयुक्तीक ठरेल समताधिष्ठीत धर्मावर आधारलेली समाजरचना प्रस्थापित करणे उचित ठरेल असे आग्रही प्रतिपादन महात्मा फुले करतात. त्यांच्या मते सामाजिक समतेच्या पर्यावरणातच एकतेची भावना निर्माण होणे शक्य असून सामाजिक, आर्थिक समतेशिवाय राष्ट्रभावनेचे गठन होवू शकत नाही. शुद्रातेशुद्रांची गुलामगिरी तशीच ठेवून तुम्ही अशा प्रकारची एकता साकारणार काय? असा मर्मभेदी प्रश्न महात्मा फुले करतात. शुद्रांना शिक्षण देण्यापासून परावृत्त करण्यात आले होते. 'ब्राम्हणी' धर्माने नकार दिलेल्या स्त्रियांना शिक्षण देण्याच्या हेतुने त्यांनी शाळा काढल्या. ब्राम्हण धर्मावर कठोर टिकेचा प्रहार करून ही महात्मा फुले ब्राम्हणवाद आणि ब्राम्हण यात फरक करतात त्यांच्या मतानुसार ब्राम्हण त्यांना भावासारखे वाटतात तर ब्राम्हणवाद विषयी त्यांना अतिशय घृणा वाटते.

प्रस्थापित समाज व्यवस्थेत उच्च नीच कनिष्ठ वरिष्ठ अशी जी दरी विषमता निर्माण झाली आहे ती जर नष्ट करावयाची असेल तर जाती अंताचा लढा देणे आवश्यक आहे असे महात्मा फुलेंना वाटते. अशा प्रकारच्या महात्मा फुले यांच्या जाती अंताच्या सिध्दांतात त्रिपदरी कार्यक्रमाचे नियोजन अनस्यूत होते.

१. ब्राम्हणेत्तर जातीचे अभेद्य संघटन बनवणे.

२. त्यांचे हक्क आणि त्यांच्या अधोगतीस कारणीभूत ठरलेल्या शक्तीच्या विरोधात त्यांच्यात जागृती निर्माण करणे.

३. त्यांच्यात निर्माण झालेल्या आत्मभानातुन हक्क आणि मानवी प्रतिष्ठा पुनर्प्राप्तीची त्यांच्या मनात तीव्र अभिलाषा निर्माण करून त्यांना संघटीतरित्या संघर्षास गतीशील करणे.

मध्यम आणि कनिष्ठ बहुजन समाज जाती महात्मा फुले यांच्या जातीअंताच्या कार्यक्रमात सहभागी होवू शकल्या नाहीत. महात्मा फुले यांनी ब्राम्हणी धर्म आणि त्यांनी लादलेल्या बहुजनांशील गुलामगिरी विरूद्ध बंड पुकारले परंतु एक बाजुने होणारा विरोध व दुसऱ्या बाजुकडून न मिळणारा प्रतिसाद यामुळे त्यांच्या जातीअंताच्या कार्यक्रमावर एकोणिसाव्या शतकात कमालीच्या मर्यादा पडल्या. २० व्या शतकाच्या आरंभी काही दशकात. ब्राम्हणोत्तर चळवळीने फुले तत्वज्ञानाचा आधार घेवून शुद्रातिशुद्रांना गठीत होण्यास साद घातली असली तरी काही अपवाद वगळता प्रामुख्याने राजकीय सत्ता संपादनाचे गुपीतच त्यात दडलेले होते. महात्मा फुले आणि त्यांच्या सत्यशोधक समाजाच्या वैचारिक बैठकीने २० व्या शतकातील डॉ.आंबेडकरांच्या चळवळीस भौतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले.

## संदर्भग्रंथ सूची

१. कीर/मालशे (संपादित) महात्मा फुले समग्र वाङ्मय, मुंबई १९६९
२. नामदेवराव खामकर, महात्मा फुले, बहुजन नायक ४ डिसेंबर १९८३
३. कीर मालशे क्रं.१
४. धनंजय कीर, महात्मा ज्योतीराव फुले



S.P. Mahavidyalaya, Bhoom
BHOOM
Ta. Bhoom Dist. O...

PRINCIPAL
S.P. Mahavidyalaya, Bhoom
Dist. Osmanabad